# अर्धशतकापूर्वीचा मराठवाडा

**न्या. नरेन्द्र चपळगावकर**

पन्नास वर्षे झाली असतील, मी माझ्या चुलत्यांच्या पुस्तकांच्या दुकानात सहज बसला होतो. आंध्र प्रदेशातून आलेला नकाशाच्या वह्या विकणारे एक वयस्क तेलगू गृहस्थ बसले होते. त्यांनी आमच्या दुकानाची ऑर्डर कालच घेतली होती, आज ते पुन्हा आले होते. बराच वेळ इकडचे तिकडचे इंग्रजीत बोलून त्यांनी वेळ काढला. नंतर ते चुलत्यांना म्हणाले, 'मला सांगताना संकोच वाटतो; पण इलाज नाही. मी कालपासून जेवलेलो नाही. भात हेच माझे जेवण आहे आणि बीडमध्ये भात देणारी खाणावळ नाही. मी आज तुमच्याकडे जेवायला येऊ का?' माझ्या चुलत्यांनी आनंदाने होकार दिला आणि त्यांना घरी जेवायला बोलावले. मी त्यांच्या शेजारीच जेवायला बसलो होतो. गृहस्थ आनंदाने जेवले आणि आमचे आभार मानून गेले. त्यावेळी बीडमध्ये तुळजापूरकरांची एकच खाणावळ होती. त्यात फक्त पोळी आणि वरण, भाजी मिळावयाची. आमच्या घरीसुद्धा रोज भात नसे.

गावात खाणावळ नव्हती. तसे हॉटेलही नव्हते. राजुरवेशीच्या बाहेर शाळेच्या कंपाऊंडला लागून रस्त्यावरच तीन दगड मांडून दत्तू आणि दिगंबर हे दोन भाऊ चहाचे दुकान चालवित.चहा मात्र उत्तम असे. गावातले सगळे दूध गावातच राही. दूधसंघ नव्हते. त्यामुळे चांगले दूध गावात भरपूर मिळे. आमच्या वाड्याच्या समोरच्या रस्त्यावर सकाळी 'दही ऽऽ, दूध ऽऽ' असे आवाज ऐकू येत. शेजारपाजारच्या खेड्यातले दही आणि लोणी विक्रीला येई. दूधवाले तर रस्त्याच्या कडेला ओळीने बसलेले असत. हे आवाज आणि रस्त्यावर विपुलतेने मिळणारे हे पदार्थ, दोन्हीही आता राहिले नाही.

गावात मिळणारे आणि असणारे बरेचसे अदृश्य झाले तर बरेचसे नव्याने गावोगाव आले. बीडसारख्या गावात फुलेच नव्हती. फुलवाला अहेमद औरंगाबादला तारेने रोज मागणी नोंदवायचा आणि फुले बीडला यावयाची. सिमेंट किंवा लोखंड कमी लागायचे पण जेव्हा लागेल तेव्हा ते जालन्याहून आणावे लागे. लग्नाचे बस्ते तर सगळ्या मराठवाड्यातले लोक मानवतला बांधायचे. तेथेच चांगला कपडा मिळतो, असा समज असे. गावात चांगला कोट शिवणारा शिंपीसुद्धा नव्हता. कोणी हैदराबादला अगर औरंगाबादला गेले तर तेथून कोट शिऊन आणावा लागे.

गावात तर वर्तमानपत्र नव्हतेच; पण ते अख्या मराठवाड्यातही नव्हते. 'मराठवाडा' नावाचे साप्ताहिक सुरू झाले होते; पण ते हैदराबादला छापले जात होते. मराठवाडाभर मुंबईच्या वर्तमानपत्रांची डाक आवृत्ती यावयाची. बातमी ताजीच असावी असा फारसा आग्रहसुद्धा नसे. बीड, अंबाजोगाई, परभणी किंवा लातूर अशा गावांची नावे वर्तमानपत्रात दोन- दोन वर्षे कोणत्याच निमित्ताने छापून येत नसत. मात्र वर्तमानपत्रांना लोकमानसात जबरदस्त विश्वसनीयता होती. एखादी गोष्ट खरी नसावी असा आपण वाद घातला तर समोरचा माणूस म्हणे 'असं कसं म्हणता, छापून आलं आहे!' इतका छापलेल्या मजकुरावर विश्वास होता.

'केसरी'चा मी वार्ताहर होतो. ते पत्र आठवड्यातून तीन दिवस निघे आणि पोस्टाने येई. पण टपाल वेळेवर मिळे आणि दिवसातून दोनदा मिळे. त्यामुळे परवा दिवशी मी संध्याकाळी पोहोचणार आहे हे बातमीसुद्धा नातेवाईकांना पोस्ट कार्डावर कळवता येत असे व आपण जाण्यापूर्वी कार्ड पोहोचलेले असे. तार येणे ही सर्वसाधारण कुटुंबात घबराट माजविणारी घटना असे. मी औरंगाबादला शिक्षणासाठी होतो तेव्हा बातमीदार म्हणून दूरध्वनीवरून बातम्या पाठवाव्या लागत. त्यासाठी जुन्या बाजारातल्या मुख्य पोस्टात जावे लागे. औरंगाबादहून पुण्याला फोन मिळण्याला दोन- दोन तास लागत. खासगी माणसांना फोन करावयाचा तर अगोदर पोस्टातला माणूस त्याच्या घरी जाऊन त्याला पोस्टात बोलावून घेई आणि मग पुन्हा एकदा संपर्क जोडून बोलणे करून दिले जाई. हा सगळा

फारच उपातापाचा प्रकार असे. त्यामुळे फारच आवश्यक असेल तरच फोनवर बोलण्याची प्रथा होती. आज संवाद सुलभ आणि सोपा झाला. रस्त्यावरची रहदारी थांबवून वाहन चालवताना मोबाईलवर बोलण्याची सोय झाली. संवादाची साधने खूप झाली; मात्र माणसामाणसांतले संवाद कमी झाले. मी स्वामीजींचे चरित्र लिहित होतो. त्यासाठी काही कागदपत्र पाहण्यास हैदराबादला गेलो. कृष्णकांत तेव्हा राज्यपाल होते. त्यांना भेटण्यासाठी गेलो. आमच्या संभाषणात कृष्णकांतांनी सहज गंमत म्हणून मला म्हटले, ‘‘बरे झाले तू पूर्वीच्या काळातल्या एका नेत्याचे चरित्र लिहितो आहेस. त्यावेळेला पत्रे लिहिण्याची प्रथा होती म्हणून दोन माणसांत काय संवाद झाला हा तुला कळू शकतो, मिळू शकतो. आजच्या- मोबाईलच्या युगातल्या एखाद्या नेत्याचे चरित्र लिहित असतास  तर काय केले असतेस?’’

औरंगाबादसारखी काही शहरे वगळली तर मराठवाड्यात वीज नव्हतीच. बीडला १९५६ साली वीज आली. तोपर्यंत नगरपालिकेच्या मिणमिणत्या दिव्याने खडीचे रस्ते प्रकाशमान झाल्याचा भास व्हावयचा. रात्री डॉक्टरला बोलवायचे, कीर्तनाहून परत यावयाचे अगर विंचू चावल्यामुळे मंत्र टाकून घ्यावयाचा असेल तर हातात कंदील लागे. कंदीलसुद्धा चैन होती. अगदीच गरीब कुटुंबात चिमणीच असे. शहरातल्या सार्वजनिक नळव्यवस्थांना नुकतीच सुरुवात होत होती. अनेक ठिकाणी अजून त्या योजना यावयाच्या होत्या. बीडमध्ये घराघरात आड होते. मोठ्या वाड्याच्या आडावर सगळा वाडा आणि आजूबाजूचेही लोक पाणी भरीत. धुणी मात्र गृहिणींना बिंदुसरा नदीवर न्यावी लागत. नदीपलीकडच्या पेठ भागात पाणीच नव्हते. त्या भागातल्या व्यापारात गुंतलेल्या सगळ्याच कुटुंबातल्या स्त्रिया डोक्यावर हंडा घेऊन नदीकाठी येत. पात्राजवळ वाळूत झरा खोदून त्यातून वाटीने पाणी घेत व १५-२० मिनिटांत हंडा भरला की तो घेऊन जात. आता पेठेत नळ झाले ते बरे झाले. कारण नदीच्या पात्रात पाणीच नाही आणि वाळू तर अदृश्यच झाली.

जिल्ह्याच्या ठिकाणी एक सरकारी हायस्कूल व तालुक्याच्या ठिकाणी फक्त माध्यमिक शाळा फक्त असत. . १९५२ साली  मॅट्रिकची परीक्षा प्रथमच बीडला झाली. त्यापूर्वी औरंगाबाद केंद्र घ्यावे लागे. १९५३ साली मी मॅट्रिकला बसलो त्यावेळी अंबाजोगाईचे विद्यार्थी बीडला परीक्षा देण्यासाठी आले होते. कॉलेज तर फक्त औरंगाबादला होते तेही अर्धेमुर्धे म्हणजे इंटरपर्यंत. औरंगाबाद, नांदेडला ती नंतर निघाली. इंजिनिअरिंग किंवा मेडिकलसाठी हैदराबादेत जावे लागे. दरवर्षी मराठवाड्यातल्या दहा-पंधरा मुलांना फक्त या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळे. गावात हैदराबादच्या कॉलेजमध्ये शिकणारा मुलगा सुटीसाठी आला म्हणजे तो आणि त्याचे कपडे हा लोकांच्या कुतूहलाचा विषय असे. धोब्याने कडक इस्त्री केलेली कॉड्राची पँट आणि दोन गुंड्या उघडा असलेला शर्ट घातलेला तसा कोणी आला म्हणजे आपणही तसे व्हावे असे हळूच मनात येई.

गावात कुतूहलाचे अनेक नवे प्रकार घडू लागले होते. सरकारी शाळेत एक शिक्षक पुण्याहून बदलून आले. त्यांच्या पत्नी बीडला नुकत्याच सुरू झालेल्या मुलींच्या सरकारी प्रशालेत शिक्षिका म्हणून आल्या. अतिशय सोज्जवळ असलेले हे कुटुंब दररोज संध्याकाळी फिरायला जाऊ लागले. पती- पत्नी एकत्र फिरायला जातात ही फारच नावीन्याची गोष्ट होती. त्यांना फिरताना पाहण्यासाठी मुद्दाम बरीच मंडळी फिरायला जाऊ लागली आणि त्यांनाही आपोआप व्यायाम घडू लागला. बीडच्या पोस्टात एक पोस्टमास्तर मुंबईहून बदलून आले. त्यांची मुलगी घरून शाळेला सायकलवरून जाऊ लागली आणि सायकलवरून जाणारी मुलगी पाहण्यासाठी रस्त्यावर गर्दी वाढू लागली. राज्यपुनर्रचनेनंतर मराठवाड्यात बाहेरचे कर्मचारी येऊ लागले आणि त्याचा सांस्कृतिक कामकाजावरही परिणाम झाला. पूर्वीच्या काळी मुलींच्यासाठी फक्त सातवीपर्यंत शाळा होती आणि त्या शाळेला फारशा मुली येत नव्हत्या म्हणून मुलींना नेण्यासाठी एक सरकारी छकडा असे. तो घरोघर जाई आणि  शाळेचा शिपाई ‘चला ताईसाहेब’ म्हणून मुलींना आवाज देई. मुलगी आली म्हणजे तिच्या जवळच्या दप्तर शिपाई हातात घेऊन ताईंना छकड्यात पोहचवी. निजामी काळात छकड्याला पडदा असे. हा सगळा थाट पुढे नष्ट झाला.

गावातल्या सरकारी हायस्कूलशिवाय एक खासगी शाळा अस्तित्वात होती. अंबाजोगाईच्या

योगेश्वरी शाळेत मराठवाड्यातील दूरदूरची मुलेही शिकायला असायची. शाळेतले शिक्षक शाळेतच नव्हे तर त्यांच्या घरीसुद्धा विद्यार्थ्यांना उपलब्ध असावयाचे. क्वचित कोणी तरी शिकवण्या घ्यावयाचे; पण हा प्रकार आजच्यापेक्षा कमी होता. गावात पुस्तकाचे दुकान एखादेच असायचे. त्यातही क्रमिक पुस्तकेच मिळावयाची. अवांतर वाचनाचे पुस्तक मिळणारे पहिले दुकान औरंगाबादला जोशी बद्रर्सने उघडले. शिक्षण घेणे तसे सगळ्यांना सोपे नव्हते. लातूरला मी साठ साली शिकवत होतो तेव्हा आमच्या महाविद्यालयातील आजूबाजूच्या खेड्यातील बरीच मुले मोंढ्यातल्या आडत्याच्या दुकानी झोपत, तेथेच बाहेर नळावर आंघोळ करून ते कॉलेजला येत. गाव जवळ असले तर त्यांचे जेवण कोणी तरी आणून देई. साधारण इस्त्रीचे कपडे घातलेल्या मुलांची संख्या कमीच असे. मराठवाड्यातल्या ग्रामीण भागाचे वास्तव ज्याला कळाले होते असा प्राचार्य म्हणजे उदगीरचे ना.य. डोळे. त्यांचे व्यवस्थापन काही अभिनव गोष्टी करी. उदा. महाविद्यालयाची फी प्रवेश घेताना देण्याची गरज नाही, ती मुगावर दिली तरी चालेल असे चक्क जाहिरातीतच लिहिलेले असे. कॉलेजमध्ये सायकल शिकविण्याचा वर्ग चाले. या उपक्रमांची काही मंडळी थट्टा करीत; पण हे खरोखरच आवश्यक असे. परीक्षेत कॉपी होण्याचे प्रकार अगदी क्वचित घडत.

मराठवाड्यात हाताच्या बोटावर मोजण्याइतकी चित्रपटगृहे होती. त्यातही बहुतेकवेळा बाहेर चालून चालून जुने झालेले चित्रपट लागत. मराठवाडा हा हैदराबाद, मध्यप्रदेश व वऱ्हाड या सर्किटला जोडलेला होता. इतरत्र चालून मोकळ्या झालेल्या प्रिंट आमच्या वाट्याला येत. चित्रपटगृहात डबल मशीन नसत. त्यामुळे चार- पाच मध्यंतर होत. नाटके फारच क्वचित येत. पन्नास- पंचावन्नपर्यंत नाटक कंपन्यांनाही उतरती कळा लागली होती क्वचित नानासाहेब शिरगोपकरांच्या आनंद संगीत मंडळीसारखे कुणी प्रयोग लावी आणि गावात उत्साहाचे वातावरण निर्माण होई.

एखाद्या देवळाच्या मदतीसाठी गावातले हौशी कलाकार नाटके बसवीत. देवळातच ती नाटके होत. कुणी तरी मुंबईला जाऊन नेपथ्याचे सामान आणी. स्वतंत्र नाट्यगृहे तर परवापरवापर्यंत नव्हती. औरंगाबादला जाधवमंडीत नाटके होत. इतरत्र देवळांचा आधार असे. स्वातंत्र्यानंतर गणेशोत्सवात कार्यक्रमाची विविधता वाढली. मात्र खर्चिक भव्य सजावटी बिलकुलच नव्हत्या. एकांकिका, सुगम गीतगायन वगैरे प्रकार सुरू झाले. परंतु शास्त्रीय संगीताच्या मैफिली एकंदर कमीच. शिकवणारे होते, गाणारेही होते; परंतु पैसे देऊन गाणे ऐकणारे नव्हते. १९५६-५७ च्या सुमाराला काही ठिकाणी एखाद-दुसऱ्या उत्साही आणि गावात वजन असलेल्या रसिकाच्या पुढाकाराने म्युझिक सर्कले सुरू झाली. बीडला डॉ. पेंढारकर, औरंगाबादला गोपाळराव किणी व नंतर डॉ. रघुनाथराव भागवत यांचा त्यात पुढाकार होता. काही ठिकाणी योगायोगाने जुळलेल्या ऋणानुंबधामुळे मोठे गायक मराठवाड्यात गाऊन गेले. बीडला गोपाळराव देशपांड्याच्या घरी पंडित जसराज अनेक वेळा गायले. महाजन नावाच्या एका कार्यकारी अभियंत्याचा वाढदिवस १ जूनला असे. त्यानिमित्ताने दरवर्षी भीमसेन जोशींचे गाणे ऐकायला मिळे. त्यांच्याच पाठिंब्याने अनेक चांगल्या शास्त्रीय गायकांचे गाणे एका गणेशोत्सवात बीडला ऐकायला मिळाले. १९५३ सालापर्यंत औरंगाबादला आकाशवाणी केंद्र होते. तोपर्यंत मराठवाड्यातल्या कलावंतांना त्यात संधी मिळे. ते अचानक बंद झाले. बऱ्याच काळाने ते सुरू झाल्यानंतर पुन्हा कलावंतांना हे व्यासपीठ उपलब्ध झाले.

आज लग्नसमारंभाची तयारी मंगल कार्यालय नोंदवून ठेवण्यापासून सुरू होते. त्याकाळी मराठवाड्यात मंगलकार्यालयच नव्हते. त्याची गरजही नव्हती. लोक फारसे श्रीमंत नव्हते. लग्न स्वत:च्या किंवा इतर कोणाच्या वाड्यात होई. वाड्याच्या चौकात जाजम वर चार टोकांना बांधले म्हणजे झाला मंडप. त्यालाच खाली पांढऱ्या कपड्यावर स्वस्तिक काढले म्हणजे तो शुभ होई. पत्रिका १९५२-५३ पर्यंत छापल्याच जात नव्हत्या. लग्नाची निमंत्रणे बाहेरगावी पत्र लिहून पोस्टाने जात. गावात ती घरोघर सांगणारे लोक अस्तित्वात होते. पत्रिका आल्यानंतरही त्यात लेकीसुना- इष्टमित्रांसह सर्वांना आमंत्रण असे. कारण जेवणाचे निमंत्रण वेगळे असे व ते घरटी कोणीही एक यावे अशा पद्धतीचे

असे. सांगणारा माणूस अंगणात उभा राहून मोठ्याने अमक्याच्या घरी लग्न तुम्हाला जेवणाचे निमंत्रण असे सांगे, म्हणजे घरातले कुणी तरी जायचे. बापाच्या नावचे निमंत्रण सांगितले गेले तरी मुलाला जेवावयास जाण्याला संकोच वाटत नसे. जेवायला जाताना पाणी पिण्याचे भांडे बरोबर न्यावयाचे. कारण त्या घरी इतकी भांडी कुठून असणार. जेवायला पत्रावळी असत. जेवणाचे सेट आणि टेबले यांचा जन्म झाला नव्हता. गावातल्या चार दोन प्रतिष्ठित घरामध्ये मोठ्या स्वयंपाकाला लागणारी भांडी आणि पाट असायचे. ज्याला गरज लागेल त्याने ते घेऊन जावयाचे व पुन्हा आणून द्यावयाचे असा क्रम असे. बिनभाड्याने ही सोय गल्लीतल्या सर्वांसाठी उपलब्ध असे.

निजाम सरकारचे मोठे उत्पन्न म्हणजे शिंदी. शेतकऱ्याच्या शेतात आपोआप आलेले शिंदीची झाडे तोडण्यावर बंदी होती. कारण त्यातून सरकारी उत्पन्न मिळे. मोठ्या गावाच्या जवळ शिंदीखाने असत. शिवाय गावात बाजारपेठेत एक अफुचे दुकान असे. लहान मुलांना अफू देऊन झोपविण्याचा आयाबयांचा प्रघात होता. एकामागोमाग झालेली मुले आणि घरचे काम चुकायचे नाही यातून मार्ग म्हणजे थोडीशी अफू देऊन त्यांना झोपवणे. हल्लीच्या ॲलोपॅथिक औषधांपेक्षा त्यांना ते सोयीचे वाटे. गावात दोन-तीनच डॉक्टर असत. अगदीच जास्त झाले तरच त्यांच्याकडे रोगी जाई. अन्यथा कपाळावर सुंठ लावणे, तुळशीचा काढा घेणे, बेंडावर पोटीस बांधणे यावर भागविले जाई. बाळंतपण बहुतेक घरीच होई. गावातली सुईण बोलावली जाई. पुढचा महिनाभर घरातल्याच एका खोलीला जुने पातळे बांधून अंधाऱ्या मॅटर्निटी वॉर्डचे रूप देण्यात येई. महिला डॉक्टर फारच कमी होत्या. खेड्यात तर वैद्यकीय उपचार उपलब्धच नव्हते.

लेखक-कवी होते; मात्र त्यांच्या लेखनाच्या प्रसिद्धीची साधने फार कमी होती. 'मराठवाडा' साप्ताहिकात दोन- चार जणांच्या कथा अधूनमधून यायचा. १९५३ साली 'प्रतिष्ठान' सुरू झाले. त्यात कथा आणि कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. आज दिसणारी निरनिराळ्या गावी प्रसिद्ध होणारी दैनिके, साप्ताहिके नव्हती. मुद्रणालये कमी होती. प्रकाशक तेही फार दुर्मिळ होते. स्वत:च्या खर्चाने हौस म्हणून कवितासंग्रह किंवा पुस्तक काढावे एवढी आर्थिक सुस्थिती बहुतेक लेखकांची नव्हती. त्यामुळे प्रातिनिधीक संग्रहांचे युग स्वातंत्र्यानंतरसुद्धा मराठवाड्यात चालू राहिले. प्रत्येकाने थोडा थोडा हातभार लावावयाचा आणि सर्वांचे लेखन एकत्रितपणे मुद्रित झाल्याचे सुख पाहावयाचे. ग्रंथालयेसुद्धा स्वातंत्र्य चळवळीच्या काळात जी पाच- सात निघाली तेवढीच होती. १९५३ च्या सुमाराला बाबासाहेब परांजप्यांनी त्यांचे एक स्नेही पुण्याचे रा.ज. देशमुख यांना सांगून काही पुस्तकांचे संच मराठवाड्यातल्या काही कार्यकर्त्यांकडे पाठविले. त्यातून 'विचार विकास मंदिर' या नावाने काही ग्रंथालये सुरू झाली. त्यातून प्रेरणा घेऊन आणखी काही ठिकाणी ग्रंथालयाचे प्रयत्न झाले.

माझ्या वडलांनी अंबाजोगाई मतदारसंघातून हैदराबाद विधानसभेची निवडणूक लढविली ती माझ्या चांगलीच स्मरणात आहे. अंबाजोगाई हा तेव्हा द्विसदस्यीय मतदारसंघ होता. एवढ्या प्रचंड मतदारसंघात फिरण्याला एकच जीप, ती ही अधूनमधून बंद पडणारी उपलब्ध होती. सभांची व्यासपीठे सजवण्यासाठी पैसेच नव्हते. बरे तर बरे जीपमध्ये बसणारे कार्यकर्ते तेव्हा पैसे मागत नव्हते. विरुद्ध उमेदवाराकडेसुद्धा फारसे पैसे नव्हतेच. त्यातला एक उमेदवार तर सायकलवरच फिरत होता. सगळे राजकारणच गरीब होते. आजच्या तुलनेने फारच मिळमिळीत निवडणुका असत. एक ध्वनीवर्धक असायचा. तो आपणच बरोबर घेऊन जायचा. देवळाच्या पारावर बसले की स्टेज व्हायचे. एखाद दुसरे पत्रक छापायचे. प्रत्येक मतदारसंघाला पक्षाने पाचसातशे पोस्टर दिलेले असत. तेवढीच पक्षाची मदत. राजकारण गरीब असल्यामुळे असेल पण त्यात आज असलेली जीवघेणी कटुताही नव्हती. त्यावेळी ज्यांनी निवडणूक लढवली त्यापैकी कुणाला हल्लीच्या मापदंडाने तिकीटसुद्धा मिळणार नाही. वडलांना तेव्हा पंधरा-सोळा हजार रुपये खर्च आला. आता तर नगरपालिकेची किंवा ग्रामंचायतचीसुद्धा निवडणूक त्यात होणार नाही. राजकारण हे आता सत्ताकारण झाले. सत्ता ही पैसे मिळवून देऊ शकणारी आणि म्हणून पैशानेच प्राप्त होणारी गोष्ट झाली. सगळेच महाग झाले.

वडील वकिली करत होते. सगळ्याच वकिलांच्या घरी बैठकीत किंवा व्हंरड्यात एक संतरजी टाकलेली असे. पिण्याचे पाणीही तिथे असे. तारीख असो वा नसो, शहरात कोणत्याही निमित्ताने आलेला सध्याचा किंवा पूर्वीचा पक्षकार रात्री मुक्कामाला तेथेच असे. जवळच्या दशम्या खाल्ल्या व वकीलसाहेबांच्या घरचे पाणी प्याले म्हणजे काम भागत असे. गावात लॉज नव्हते. असतेच तर त्याला देण्यासाठी पैसे नव्हते. वकील आणि पक्षकार यांचे संबंध हे त्याच्या प्रकरणापुरतेच मर्यादित नव्हते शेतातला वानवळा आठवणीने वकिलांच्याही घरी येई. बीडजवळ काकडहिऱ्याला कधीकाळी आमचे पक्षकार असलेले अण्णा बागलाणे राहत. काकडहिऱ्याच्या आसपास डोंगरावर मोर होते. मोराची पिसे आणि शेतातील भाजी ते आणून देत. त्यावेळी आजच्या तुलनेने फी कमी मिळे. परंतु फीव्यतिरिक्त जे प्रेम मिळे ते फार महत्त्वाचे होते.

आता पुष्कळ सुधारले, सोयी झाल्या, दळणवळण वाढले, खेड्यात करमत नाही म्हणून आजूबाजूच्या खेड्यातले अनेक लोक विशेषत: तरुण काम नसले तरी रोज सकाळी शहरात येतात आणि रात्री नाईलाजने परत जातात. टेरिलीनचे शर्ट आले, नंतर ट्रॅंझीस्टर आले, आता मोबाईल आले. अधिक चांगल्या करमणुकीच्या आणि चैनीच्या सोयीही झाल्या. व्यसनेही उपलब्ध झाली. खेडी भकास होण्याला प्रारंभ झाला. अनेकांनी शहरात घरे केली. मराठवाड्यातील जिल्हा- तालुक्यांच्या गावाची लोकसंख्या खूपच वाढत गेली आणि वाढतेच आहे. आपण सुधारलो. पूर्वी छोटीशी शहरे खेड्याच्या आसऱ्याने  जगत होती. आज तसे राहिले नाही, खेड्यांचे अस्तित्वच शहराला कसेबसे लोंबकळून राहिले आहे.

# वीज भारनियमनाचे वेळापत्रक

| वार | वेळ |
|---|---|
| सोमवार- मंग्ळवार | स. १० ते १२, दु. २ ते ४ |
| बुधवार- गुरुवार | स. ८ ते १०, दु. १२ ते २ |
| शुक्रवार- शनिवार | स. १० ते १२, दु. २ ते ४ |
| रविवार | स. ८ ते १०, दु. १२ ते २ |


# वीज भारनियमनाचे वेळापत्रक

| वार | वेळ |
|---|---|
| सोमवार- मंग्ळवार | स. १० ते १२, दु. २ ते ४ |
| बुधवार- गुरुवार | स. ८ ते १०, दु. १२ ते २ |
| शुक्रवार- शनिवार | स. १० ते १२, दु. २ ते ४ |
| रविवार | स. ८ ते १०, दु. १२ ते २ |